# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** वाशिम **P.S.(ठाणे):** मानोरा

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0745 **Year (वर्ष):** 2023

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**16/11/2023 22:24

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7A |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** गुरूवार
**Time Period (कालावधी):** पहर 4
**Date From (दिनांक पासून):** 16/11/2023
**Date To ( दिनांक पर्यंत):** 16/11/2023
**Time From (वेळेपासून):** 11:57 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 12:10 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 16/11/2023 **Time (वेळ):** 21:15 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 030
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 16/11/2023 22:15 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and *distance* from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पूर्व, 10 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** ग्राम माहूली ,मानोरा

(c)**In case, *outside the limit* of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** सत्यपाल गोंविद राठोड

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1993

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | माहुली, ,मानोरा ,मानोरा ,वाशिम,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | माहुली, ,मानोरा ,मानोरा ,वाशिम,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):**

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | सौ.गौकर्णा विष्णू राठोड | | | 1. ग्राम माहूली ,मानोरा ,मानोरा , वाशिम,महाराष्ट्र,भारत |
| 2 | विष्णू मंगू राठोड | | | 1. माहूली ,मानोरा ,मानोरा , वाशिम,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 13000 रू जप्त | 13,000.00 |

**10 Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

13,000.00

**11.Inquest Report / U.D. case No., If any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

**12.First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्यादि पो.स्टे.मानोरा दि.16.11.2023नाव- सत्यपाल गोंविद राठोड, वय-30 वर्श, जात - बंजारा, व्यवसाय खाजगी नौकरी, रा. माहुली, पोस्ट भुली, ता.मानोरा, जि.वाशिम. मो.न.8975944585.मी समक्ष तक्रार देतो की, मी वरील ठिकाणी परिवारासह राहतो व मालेगांव जि.नाशिक येथे चैतन्य सिटी स्कॅन सेंटर येथे टेक्नीषियन म्हणुन खाजगी नोकरी करतो. माझे शिक्षण एम.ए. ईतिहास मध्ये झाले असून माझी बोली भाषा बंजारा असुन आमच्या समाजातील लोकांशी बंजारा भाषेत वार्तालाप करतो. मी दि.09.11.2023 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय वाशिम येथे लाच मागणीबाबत तक्रार दिली की,"सध्या मी माझे गावात मातीच्या कुडाचे घरात राहतो. माझे नावावर गावात जागा असल्याने मी यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत घरकुल योजनेची माहीती करुन घेतली असुन मला घरकुल योजनेचा लाभ घ्यायचा आहे. मी यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजने अतंर्गत मला घरकुलचा लाभ मिळण्याकरिता फाईल तयार करुन अर्जाचे सर्व कागदपत्र जोडलेले असुन माझे फाईलवर आमच्या गावचे ग्रामसेवक यांची सही झालेली असुन फक्त महीला सरपंच सौ.गौकर्णा विष्णू राठोड यांची सही होणे बाकी आहे. तसेच माझे चुलते मंगलसिंग आत्माराम राठोड यांनी सुध्दा यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजनेच्या अतंर्गत घरकुल योजनेची फाईल तयार केली असुन त्या फाईलवर सुध्दा महिला सरपंच राठोड यांची सही बाकी आहे. माझे चुलत आजोबा दयाराम राठोड यांना दोन विहीरी पाहीजे असल्याने ते सुध्दा फाईल तयार करीत आहेत. दि.08.11.2023 रोजी मी माझे घरकुलच्या फाईलवर आमच्या गावचे महीला सरपंच सौ.गौकर्णा विष्णू राठोड यांची सही, शिक्का घेण्याकरीता त्यांच्या घरी गेलो असता सरपंच सौ.गौकर्णा विष्णू राठोड व तिचे पती विष्णू यांनी ''तुझे फाईल सोबत नातेवाईकाचे एकत्रच फाईल घेवुन ये'' असे म्हणुण फाईलवर सही व शिक्का देण्याकरिता मला माझे नातेवाईकाच्या विहीरीसाठी प्रत्येकी 5000/- रू. तर घरकुलासाठी प्रत्येकी 2,000/- रुपयेची मागणी केली आहे.'' तु पैषे दिले नाहीतर तुझ्या फाईलवर सही व शिक्का देणार नाही'' असे मला म्हणुन सरपंच सौ.गौकर्णा विष्णू राठोड व तिचे पती विष्णू राठोड यांनी माझ्या घरकुलचे फाईलवर सही, शिक्का देण्याकरिता 2000/-रुपये लाचेची मागणी केली आहे. सरपंच सौ.गौकर्णा विष्णू राठोड व तिचे पती यांना माझी लाच देण्याची ईच्छा नाही. यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजणे अतंर्गत घरकुल मिळण्याकरिता कोणतीही फी किंवा पैसे लागत नाहीत हे मला माहित आहे. सरपंच सौ. गौकर्णा विष्णू राठोड व तिचे पती यांनी मला माझे घरकुलच्या फाईलवर सही व शिक्का देण्याकरिता 2,000/-रु. लाच रकमेची मागणी केलेली आहे. सरपंच यांच्या सही व शिक्या शिवाय माझी घरकुलची फाईल ही पंचायत समीती मानोरा येथे स्विकारू शकत नाही. त्यामुळे मी नाईलाजास्तव त्यांना पैसे देण्याचे कबुल केले आहे. त्यांना लाच देण्याची माझी इच्छा नाही. सरपंच सौ.गौकर्णा विष्णू राठोड व तिचे पती विष्णू राठोड यांचेशी माझा कोणताही देण्याघेण्याचा किंवा उसणवारीचा व्यवहार नसून आपशी दूश्मनी नाही. तरी सरपंच सौ.गौकर्णा विष्णू राठोड व तिचे पती विष्णू राठोड यांच्यावर कार्यवाही होणेस विनंती आहे." मी वरील प्रमाणे तक्रार दिल्यानंतर पो.नि. तिप्पलवाड, यांनी मला व दोन्ही पंचांना मी दिलेल्या तक्रारीची पडताळणी कारवाई करणे असल्याचे कळविले तसेच मला व पंचांना व्हाईस रेकॉर्डर व मेमरीकार्ड बाबत तसेच कारवाई बाबत माहीती दिली. त्यानंतर मला व पंच क्र.1 श्री.बैरवार यांना गै.अ. महिला सरपंच सौ.गौकर्णा विष्णू राठोड व त्यांचे पती विष्णू राठोड यांचे भेटी दरम्यान करावयाचे कार्यवाही बाबत माहिती दिली. सरपंच सौ.गौकर्णा विष्णू राठोड व त्यांचे पती विष्णू राठोड यांचे लाच मागणीबाबत त्यांची पडताळणी करीता मला, पंच क्र.1 श्री.बैरवार यांचेसह सरपंच सौ.गौकर्णा राठोड यांचे राहते घरी ग्राम माहुली येथे पाठविले.पडताळणी कार्यवाही दरम्यान ग्राम माहुली येथे सौ.गौकर्णा राठोड व विष्णू मंगु राठोड यांचेसोबत भेट होवून बोलनी झाली. भेटी दरम्यान सरपंच सौ.गौकर्णा विष्णू राठोड यांनी म्हटले की,"वावडीचे पाच''(विहीरीचे पाच) त्यावर मी त्यांना विचारले की, ''कतरा पाच हजार'' (किती पाच हजार) त्यावर विष्णू राठोड यांनी सांगीतले की, ''सध्या पाच हजार''. त्यावर सरपंच सौ.गौकर्णा राठोड यांनी सुध्दा ''सध्या पाच ''असे म्हटले असता मी त्यांना म्हटले
की, ''घरकुलेर कि वावडीर'' (घरकुलाचे का विहीरीचे) त्यावर सरपंच गौकर्णा राठोड यांनी म्हटले की, वावडी,

वावडीर, घरकुलेर कोणी (विहीर, विहीरीचे घरकुलाचे नाही). त्यानंतर मी त्यांना विचारले की, ''कतरा घरकुलेर'' (घरकुलाचे किती). त्यावर सरपंच सौ.गौकर्णा राठोड यांनी सांगीतले की, ''घरकुलेर कमी छ कतरा छ मन मालम छेनी'' (घरकुलाचे कमी आहे किती आहे मला माहित नाही) त्यावर मी सरपंच सौ. गौकर्णा राठोड यांना विचारले की, ''तरी'' त्यावर सरपंच गौकर्णा राठोड यांनी म्हटले की,'' दि हजार छ घरकुलेर पच उ पच नंतर देकीया''(आता दोन हजार आहे घरकुलाचे. नंतर ते नंतर पाहु),'' त्यावर मी त्यांना विचारले की, ''नंतर उ घरकुल आयर बाद'' (नंतर घरकुल येईल तेव्हा). त्यावर सरपंच गौकर्णा राठोड यांनी म्हटले की, ''अब दि हजार छ घरकुलेर'' (आता दोन हजार आहे घरकुलाचे) त्यावर सरपंच गौकर्णा राठोड यांनी म्हटले की, ''चार लाखेर वावडी छ'' (चार लाखाची विहीर आहे) ...पच विस हजार'' (नंतर विस हजार) सरपंच राठोड यांनी मला विचारले की, ''आब कतरी फाईल छ तार'' (आता किती फाईल आहेत तुझ्या). यावर मी त्यांना सांगीतले की, घरकुलेर दि छ, समजा वावडीर दि छ (घरकुलचे दोन आहेत व विहीरीच्या दोन आहेत). त्यावर सरपंच गौकर्णा राठोड यांनी म्हटले की, वावडीर दस हजार, घरकुलेर दि दि हजार (विहीरीचे दहा हजार व घरकुलाचे दोन, दोन हजार) त्यावर मी त्यांना म्हटले की, ''घरकुलेर दि दि हजार''(घरकुलचे दोन दोन हजार )... ''वावडीर कतरा'' (विहीरीचे किती) त्यावर विष्णू राठोड यांनी म्हटले की, '' वावडीचे पंदर अन दिड लाख आये पर पाच ''(विहीरीचे पंधरा आणि दिड लाख आल्यानंतर पाच)..''फाईल आतच मारकन रकाडुचो तु कतीबी जो, लिकळगी की म फाईल सबमीट करूचु'' (फाईल माझे जवळ ठेवतो तु कुठेही जा निघाली की मी फाईल सबमीट करतो.) त्यावर मी त्यांना ''हा'' (हो) म्हटले. नंतर सरपंच सौ.गौकर्णा राठोड यांनी म्हटले की, ''घरकुलेर पचर पच देखा ओ वावडीर बोलली देचा'' (घरकुलाचे) नंतर पाहु आता विहीरीचे बोललो आहे.) यावर विष्णू राठोड यांनी म्हटले की, ''एक लाख चाळीस हजार रे र घरकुल छ ओर हिसोबेती तोन काई देअरच तिन हजार दची की पाच हजार दची'' (एक लाख चाळीस हजारचे घरकुल आहेत त्या हिसोबाने तिन हजार देता की पाच हजार देता) असे म्हटले त्यावर विष्णू राठोड यांनी म्हटले की, ''घरकुलेर दि दि हजार अन वावडीर पाच हजार'' (घरकुलाचे दोन दोन हजार आणि विहीरीचे पाच हजार) त्यावर मी त्यांना विचारले की, ''घरकुलेर दि हजार अन वावडीर पाच हजार'' (घरकुलाचे दोन हजार आणि विहीरीचे पाच हजार) त्यावर विष्णू राठोड यांनी म्हटले की, ''दि वावडीर दस हजार ला अजीक घरकुलेर दि दि हजार ला'' (दोन विहीरीचे दहा हजार आणि घरकुलाचे चार हजार आण) त्यावर मी त्यांना विचारले की, ''चार फाईलेर कतरा दु'' (चार फाइलचे किती दयावे लागेल) त्यावर विष्णू राठोड यांनी म्हटले की, ''चार फाइलीचे चवद हजार रूपया लागीय एक रूपया कमी कोणी व्ह'' (चार फाइलचे चैदा हजार रूपये लागतात त्यामध्ये एक रूपया हि कमी होणार नाही) त्यावर सरपंच सौ. गौकर्णा राठोड यांनी म्हटले की, ''एक कमी कर'' त्यावर मी म्हटले की, ''ठिक च आउ पच'' (ठिक आहे येतो ) असे म्हणुन माझे घरकुलाची फाईल व माझे चुलत आजोबाची विहीरीची फाईलवर सही करण्याकरिता महिला सरपंच सौ.गौकर्णा विष्णू राठोड व तिचे पती विष्णू मंगु राठोड यांनी मला 14,000/- रुपयेची मागणी करुन मला तडजोड अंती 13,000/-रुपये लाच रक्कम स्विकारण्याची तयारी दर्शविली. दि.16.11.2023 रोजी सापळा कार्यवाही दरम्यान महिला सरपंच सौ.गौकर्णा विष्णू राठोड व विशु राठोड यांचेसोबत माझी सौ.गौकर्णा राठोड यांचे राहते घरी ग्राम माहुली येथे भेट झाली. भेटी दरम्यान विष्णू राठोड यांनी मला म्हटले की, ''कत चावच सइ'' (कोठे पाहिजेत सही), ''सई हेगी काई ओपर ए चिकटेर सई'' (सही झाली काय, त्यावर चिकटयाची सही). त्यावर मी त्यांना म्हणालो की, हा चिकटेर सई व्हेगी'' (हो चिकटेची सही झाली ) नंतर मी त्यांना म्हणालो की, ''हे फाईल लं पटकन मोजल तेरा हजार छ पुरे, ह मोजल'' (हे फाईल घ्या पटकन मोजुन घ्या तेरा हजार पुर्ण आहेत. मोजुन घ्या.) असे म्हटल्यानंतर विष्णू राठोड यांनी माझ्या हातातून 13000/-रु. स्विकारले. त्यावर महिला सरपंच सौ.गौकर्णा राठोड यांनी म्हटले की, ''मन मोजतु आयनी'' (मला मोजता येत नाही). ''सई कर दुचु तार फाईलेप'' (सही करून देतो तुझ्या फाईलवर)आज दि.16.11.2023 रोजी माझे कडुन 13,000/-रूपये लाच रक्कम स्विकारल्याने मी सापळा पथकास पुर्वनियोजित इषारा केला असता सापळा पथकातील अधिकारी व कर्मचारी यांनी सौ.गौकर्णा विष्णू राठोड व त्यांचे पती विष्णू मंगु राठोड यांना लाच रक्कम रु. 13,000/- सह पंचासमक्ष रंगेहाथ पकडले.सौ.गौकर्णा विष्णू राठोड, वय-70 वर्शे, सरपंच ग्राम माहुली व विष्णू मंगु राठोड, वय 68 वर्शे व्यवसाय शेती रा.माहुली ता. मानोरा जि.वाशिम यांनी माझ्या व माझे चूलते मंगलसिंग राठोड यांच्या घरकुलाची फाईल व माझे चुलत आजोबा दयाराम राठोड यांचे नावावरील विहिरीचे फाईलवर सही करण्याकरीता स्वतःचे आर्थीक फायदया करीता गैरमार्गाने लाचेची मागणी करून माझेकडुन विष्णू राठोड यांनी लाच रक्कम 13000/-रूपये सरपंच सौ.गौकर्णा विष्णू राठोड यांचे राहते घरी ग्राम माहुली ता.मानोरा जि.वाशिम येथे आज दि.16.11.2023 रोजी स्विकारली आहे. करीता माझी महिला सरपंच सौ.गौकर्णा विष्णू राठोड व त्यांचे पती विष्णू मंगु राठोड(खाजगी इसम) यांचे विरुध्द कायदेशीर फिर्याद आहे.माझी वरील फिर्याद पोहवा आसीफ शेख, ला.प्र.वि. वाशिम यांनी लॅपटॉपवर टंकलिखीत केली प्रिंट काढुन दिल्यावर मी वाचुन पाहीली. माझे सांगणे प्रमाणे बरोबर व खरी आहे. समक्ष सही (बी.आर.तिप्पलवाड)

पोलीस निरीक्षक, ला.प्र.वि. वाशिम

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

**(1) Registered the case and took up the investigation:**
(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):
MAHESH NEMCHANDA KUCHEKAR(SI (Sub-Inspector)) / PBPAM82471 **or (किंवा)**

**(2) Directed (Name of I.O.) (तपास अंधिका-याचे नाव):**

**Rank (पद):** **No.(क्र.):**

**to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

**(3) Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**

**or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)**

**(4) Transferred to P.S.**
**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (जिल्हा):**
**on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)**

**R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)**

**14 Signature/Thumb impression of the complainant / informant.**
**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):**

**15.Date and time of dispatch to the court**
**(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

प्रत मिळाली

**Signature of Officer in charge, Police Station**
**(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)**

**Name (नाव):** MAHESH NEMCHANI
**Rank(पद):** SI (Sub-Inspector)
**No.(सं.):** PBPAM82471

ठाणे अमलदार
पो.स्टे.मानोरा जि.वाशिम